# निशाणी क्रमांक ४७ खालील आदेश

(अधिघोषीत दिनांक १६ जुन, २०२६)

अर्जदार यांनी प्रस्तुतची मागणी निशाणी क्र.४७ खाली महिलांचे घरगुती हिंसाचारापासून प्रतिबंधक कायद्याचे कलम २३(२) अन्वये अंतरीम आदेशाकरीता शपथपत्र दाखल करून अर्जातील मजकुर हा शपथपत्राचा भाग गृहीत धरण्यात यावा, असे नमूद केलेले आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे -**

**०२.** गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदार हिचे नात्याने पती असून गैरअर्जदार क्र.२ या सासु, गैरअर्जदार क्र.३ हे सासरे, गैरअर्जदार क्र.४ हे भासरे व गैरअर्जदार क्र. ५ ही नणंद आहे. दिनांक २८/०४/२०२४ रोजी अर्जदार हिचे गैरअर्जदार क्र.१ सोबत हिंदू रितीरिवाजाप्रमाणे आक्सापूर, ता. गोंडपिपरी येथे विवाह झाला. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा अर्जदाराच्या वडीलांनी मोठ्या थाटात मोठा खर्च रु. ५ ते ६ लाख करुन लावुन दिला. विवाहामध्ये अर्जदाराचे वडीलांनी गैरअर्जदार क्र.१ ला ०.३ ग्रॅम सोने ची अंगठी, तसेच १.१/२ तोळा सोण्याचा गोप व गैरअर्जदारांच्या मागणी वरुन नगद रु.१,५०,०००/- तसेच वरातीचे गाड्यांचे खर्चासाठी रु.२०,०००/- नगद स्वरुपात दिले. लग्नानंतर अर्जदार ही रितीरिवाजाप्रमाणे गैरअर्जदार यांच्या घरी नांदावयास गेली. अर्जदाराला लग्नामध्ये भेट वस्तु म्हणून लाकडी बेड, लोखंडी बेड, गादी गोदरेज आलमारी २ नग, फ्रिज, कुलर, सिलींग फुन, संसारउपयोगी आलेले संपुर्ण सामान व भांडे इ. घेऊन अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ च्या घरी आली. गैरअर्जदार क्र.१ सोबत गैरअर्जदार क्र.२ ते ४ हे एकत्र कुटूंबाने राहत होते. अर्जदार ही गैरअर्जदाराचे घरी नांदण्यास गेल्यानंतर गैरअर्जदार.१ ते ४ ने अर्जदाराला काही दिवस चांगले नांदविले. त्यानंतर गैरअर्जदारांनी त्यांचा खरा रंग दाखविण्यास सुरुवात केली. गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदाराला सांगितले की, त्याला सुट्टी नाही असे सांगुन गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदाराला चेक हत्तीबोडी येथे सोडून बुट्टीबोरीला राहण्यास गेला.

**०३.** अर्जदाराचे पुढील कथनानुसार, त्यानंतर अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ ला विचारपुस केली की, मला सुध्दा तुम्ही राहत असलेल्या व नौकरी करीता राहत असलेल्या ठिकाणी बुट्टीबोरीला घेऊन चला. तेव्हा गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदाराला काही ना काही कारणे देत होता व अर्जदाराला बुट्टीबोरीला घेऊन जाण्याचे टाळाटाळ करत होता. त्यानंतर अर्जदाराचे आई वडीलांनी अर्जदाराला गैरअर्जदार क्र.१ राहत असलेल्या ठिकाणी बुट्टीबोरी येथे पोहचता केले. अर्जदाराला गैरअर्जदार क्र.१ ने बुट्टीबोरी येथे पंधरा दिवस चांगले वागविले. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हा नेहमी फोनवर बोलत असायचा अर्जदाराला काही बोलत देखील नव्हता. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ च्या जवळ जरी गेली तर तिला तो

ढकलुन देत होता व म्हणत होता की, तु मला पसंत नाही, तु मला आवडत नाही, तुझे आईवडीलांनी आमचा लग्नामध्ये चांगला मानपान केला नाही, आमच्या ऐपती प्रमाणे लग्न लावुन दिलेले नाही, आम्हाला चांगला हुंडा मिळाला असता तुझे पेक्षा जास्त पैसा देणारी पार्टी आमचे कडे मागणी घालत होते, आम्हाला तुझे आईवडीलांनी मनावा तेवढा पैसा दिलेला नाही, तुला काम धंद्याची सोय नाही, तुझे आई वडील गावंडळ आहे असे बोलुन व वेळोवेळी टोमणे मारुन बोलत होता. तसेच तो अर्जदार व तिचे आई वडीलांचा अपमान करुन वागवत होता बोलत होता. अर्जदाराने सदर होणारा त्रास आपल्या आईवडीलांना सांगितला असता गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदाराला म्हणत होता की, तु आमची बदनामी करणे सुरू केले आहे. असे म्हणून छळ करीत होता. अश्या परिस्थीतीत अर्जदार ही गैरअर्जदाराचा त्रास सहन करुन आज ना उद्या गैरअर्जदार क्र.१ मध्ये बदल होईल आशेने राहुन गैरअर्जदाराचा त्रास सहन करुन संसार करुन राहत होती.

**०४.** अर्जदाराचे पुढील कथनानुसार, अर्जदाराला गैरअर्जदार क्र.१ हा नेहमी त्रास देत होता व गैरअर्जदार क्र.१ ला गैरअर्जदार क्र.२ ते ४ हे नेहमी अर्जदाराचा छळ करण्यास सहकार्य करीत होते. गैरअर्जदार क्र.१ हा बुट्टीबोरी येथे राहत असताना अर्जदाराला गैरअर्जदार क्र.१ ने कधीही पत्नीचा दर्जा दिलेला नाही. गैरअर्जदार क्र.१ हा नेहमी कामावरुन जाणुन बुजुन उशीराने यायचा, अर्जदाराने उशीराने येण्याचे कारण विचारले असता गैरअर्जदार क्र.१ नेहमी म्हणत होता की, तुला काय करायचे आहे, मी कोठेही जाईन कोठेही राहील, तु माझी बायको नाही, तु माझेवर शक करतेस असे आरोपी करीता होता व अर्जदाराला सांसारीक जीवनाचा उपभोग घेऊ देत नसे.

**०५.** अर्जदार पुढे कथन करते की, सदर बाबी अर्जदाराने गैरअर्जदार क्र.२ व ३ यांना सांगितल्या तेव्हा ते अर्जदाराचे काहीही ऐकुन घेत नव्हते व गैरअर्जदार क्र.१ हाच बरोबर आहे असे म्हणून राहत होते. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदाराला म्हणाला की, मला माझी नौकरी परमनंट करायची आहे तेव्हा तु तुझे बापाकडून दहा लाख रु. तुझे वडीलांच्या घरुन घेऊन ये. त्यावेळी अर्जदार म्हणाली की, तिचे आईवडीलांकडे पैसे नाहीत तेव्हा गैरअर्जदार क्र.१ ने लहान सहान गोष्टीवरुन अर्जदाराचा अधिक छळ करणे सुरू केले. गगैरअर्जदार क्र.२ ते ५ हे सुध्दा फोन करुन अर्जदाराला म्हणत होते की, तु तुझे बापाकडून पैसे का घेऊन येत नाही असे म्हणून वारंवार त्रास देत होते. त्यानंतर अर्जदाराला गैरअर्जदार क्र. १ ते ५ ने अधिक त्रास देणे सुरू केले तेव्हा अर्जदाराने गैरअर्जदार हे पैसे मागणी करुन तिचा छळ करी तअसल्याची बाब तिच्या आईवडीलांना सांगितली.

**०६.** अर्जदार पुढे कथन करते की, अर्जदाराच्या वडीलांनी यापुर्वी गैरअर्जदार

नं.१ ला हिरो होंडा दोन चाकी गाडी घेण्यासाठी रु.८०,०००/- फोन पे ने पाठविले होते. तसेच, गैरअर्जदार क्र.१ हा नागपूर येथे असतेवेळी रु.१०,०००/- दिले होते. तसेच, अर्जदाराचे वडील पैशाची गैरअर्जदार यांची पैशाची मागणी पुर्ण करु शकले नाही तेव्हा गैरअर्जदार क्र. २ ही बुट्टीबोरी येथे आली व दि.१२/१२/२०२४ रोजी गैरअर्जदार क्र.१ व अर्जदाराला मौजा चेक हत्तीबोडी येथे घेऊन आली. त्यानंतर गैरअर्जदार क्र. ५ ही सुध्दा अर्जदाराला पैसे मागुन आणण्यासाठी गैरअर्जदार क्र.१ ते ४ ला अर्जदाराचा छळ करण्यास फोनवरुन प्रोत्साहित करीत होती.

**०७.** अर्जदार पुढे कथन करते की, गैरअर्जदार क्र.१ ते ५ च्या छळाला त्रासुन अर्जदार ही दि.१५/१२/२०२५ रोजी माहेरी आक्सापूर येथे परत आली तेव्हा पासुन ती तिच्या माहेरी राहत आहे. गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांनी अर्जदाराचा छळ करुन मानसिक त्रास देऊन अर्जदाराला घर सोडण्यास भाग पाडले आहे. तसेच, अर्जदाराला लागणारे दैनंदिन खर्च, कपडा लत्ता, औषधोपचार व अन्न खर्चासाठी कोणतीही तरतुद गैरअर्जदार क्र.१ ने केलेली नाही.

**०८.** अर्जदार पुढे कथन करते की, गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांच्या वागणुकीमुळे अर्जदार यांना शारिरीक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे व नाईलाजाने तिच्या माहेरी राहावे लागत आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असल्यापासुन तिची कोणतीही विचारपुस केली नाही तसेच तिच्या उदरनिर्वाह करीता कुठलीच रक्कम दिली नाही. सध्या अर्जदार ही तिचे वडीलांच्या घरी राहत आहे. तेव्हापासून ती आश्रीतांचे जिवन जगत असल्याचे तिने नमूद केलेले आहे.

**०९.** अर्जदाराचे पुढील कथनानुसार, तिच्याकडे स्वतःचे पालन-पोषण करण्याकरीता उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट, गैरअर्जदार क्र.१ हा बुट्टीबोरी मोहगाव येथील डिफेंस कंपनीमध्ये खासगी नौकरीला असून त्याला महिना ४०,०००/- रु. इतके वेतन आहे. तसेच, गैरअर्जदार क्र.१ च्या नावाने मौजा डोंगरहळदी येथे सर्व्हे क्र. ४२/१ आराजी ०.८१ हे.आर. शेती आहे व सदर शेतीमध्ये रु. २,००,०००/- ते ३,००,०००/- रुपये इतके उत्पन्न मिळते. गैरअर्जदार क्र.१ वर अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणाचेही पालन पोषणाची जबाबदारी नाही. उपरोक्त परीस्थितीत, अंतरीम पोटगीकामी व इतर खर्चापोटी अर्जदार यांना रक्कम रुपये १५,०००/- प्रतिमाह व घरभाडे करीता रक्कम रु.५,०००/- प्रतिमाह मिळण्याची विनंती करून तिचा अंतरीम मागणीचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

**१०.** अर्जदार यांनी त्यांचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र नि.क्र.११ वर दाखल करून गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडे मौजा डोंगरहळदी येथे सर्व्हे क्र. ४२/१ आराजी ०.८१

हे.आर. शेती असल्याचे कथन केले आहे व गैरअर्जदार हा खासगी नौकरी करत असल्याचे नमुद केले आहे व त्याच्यावर अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणाचीही पालन पोषणाची जबाबदारी नसल्याचे कथन केले आहे. उपरोक्त परिस्थीतीत, अर्जदार यांनी सदरचा अर्ज मंजूर होण्याची विनंती केलेली आहे.

**<u>गैरअर्जदार यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे</u> -**

**११.** गैरअर्जदार यांनी निशाणी क्र. ४५ अन्वये त्यांचे उत्तर दाखल केलेले आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह झाल्याचे मान्य केलेले असुन, या व्यतिरीक्त त्यांनी अर्जदाराची संपुर्ण कथने खोटे व बनावटी असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच त्यांच्या विशेष कथनानुसार, अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह जातीरिवाजानुसार दि.२८/०४/२०२४ रोजी आक्सापूर येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात झाला. लग्नाच्या दिवशीच अर्जदार व अर्जदाराच्या वडीलांनी गैरअर्जदारांशी अपमानास्पद बोलले व लग्न मंडपातच भांडण केले. परंतु, सदर बाबींकडे गैरअर्जदारांनी दुर्लक्ष केले. त्यानंतर अर्जदार ही नांदण्यास गैरअर्जदारासोबत गेली व त्यानंतर एक महिना चांगला गेला. परंतु त्यानंतर कोणतेही कारण नसताना अर्जदार ही गैरअर्जदाराच्या आईसोबत नेहमीच विनाकारण भांडण करीत असे व घरचे कामे सुध्दा व्यवस्थीत करीत नव्हती, तसेच घरचे सर्व कामे गैरअर्जदाराच्या आईस करावी लागत असत. गैरअर्जदाराच्या आईला अर्जदार ही विनाकारण शिवीगाळ करत असे. अर्जदार ही गैरअर्जदारास नेहमी म्हणत असत की, मला तुझ्यासोबत लग्न करावयाचे नव्हते, माझ्या घरच्यांचा आग्रह खात मी तुझ्यासोबत लग्न केले व विनाकारण गावात फिरत असत. तेथे राहत असतांना अर्जदार गैरअर्जदाराला म्हणत असे की मला माझ्या आईची आठवण येत आहे असे म्हणून अर्जदार ही काही दिवसांनी गैरअर्जदाराला न सांगता सतत माहेरी निघुन जात असे. त्यामुळे अर्जदाराच्या अश्या वागणुकीमुळे गैरअर्जदाराला नेहमी मानसिक व शारिरीक त्रास सहन करावा लागत असे. तरीपण अर्जदार ही माहेरी आल्यानंतर ती स्वत:हून गैरअर्जदाराशी कोणतेही संयुक्तीक कारण नसताना सुध्दा भांडण करीत असे.

**१२.** गैरअर्जदार यांच्या पुढील कथनानुसार, गैरअर्जदार हे बुट्टीबोरी येथील फॅक्टरी मध्ये कंत्राटी या पदावर कार्यरत असून गैरअर्जदाराचा १७,०००/- ते १८,०००/- रुपये पगार आहे. नौकरी असल्यामुळे गैरअर्जदार हे घरी कधी कधी रात्री उशीरा येत असे तर कधी अगदी पहाटे येत असे. अर्जदाराचे एका मुलासोबत प्रेम संबंध असल्याचे गैरअर्जदाराला शेजाऱ्याकडून कळले व त्या कारणाने अर्जदार ही गैरअर्जदार सोबत नेहमी काहीही कारणास्तव भांडण करायची. गैरअर्जदार हा अर्जदार हिला तिच्या वागणुकीबद्दल बरेचदा समजुन सांगण्याचा प्रयत्न करायचा व घरी लक्ष देण्यास व घरचे काम करण्यास समजावित असे. परंतु, अर्जदार ही गैरअर्जदाराच्या सांगण्याकडे दुर्लक्ष करीत असे. तरीही

गैरअर्जदार हा स्वतच्या भवितव्याचे नुकसान होईल म्हणून अर्जदाराच्या वागणुकीकडे दुर्लक्ष करीत असे. आज ना उद्या अर्जदार हिच्या वागणुकीत बदल होईल या आशेने गैरअर्जदार हे अर्जदार हिच्यासोबत संसार करीत होते. अर्जदाराच्या अश्या वागणुकीमुळे गैरअर्जदाराला मानसिक व शारिरीक त्रास सहन करावा लागत असे.

**१३.** गैरअर्जदारांच्या पुढील कथनानुसार, गैरअर्जदार क्र.१ यांच्यासोबत त्यांची आई, वडील, बहिण व भाऊ हे राहत असून या सर्वांची जबाबदारी गैरअर्जदारावर आहे. त्यांचे औषध पाण्याचा व घराचा संपुर्ण खर्चाची जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ हे करीत आहेत. अर्जदार ही स्वत: न सांगता निघुन गेलेली असून अर्जदार हिला गैरअर्जदाराने कधीच कोणताही मानसिक व शारिरीक त्रास दिलेला नाही. अर्जदार ही मा.न्यायालयात स्वच्छ हाताने आलेली नसुन अर्जदाराने न्यायालयापासुन खरी हकीकत लपवुन ठेवलेली आहे. गैरअर्जदारांनी अर्जदाराचा कोणताही शारिरीक व मानसीक छळ केला नाही असे नमूद केले आहे.

**१४.** गैरअर्जदार क्र. १ यांनी पुढे असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र.१ हे खाजगी कंपनीत नौकरीत असून त्यांना महिन्याकाठी रु.१७,०००/- ते १८,०००/- येवढा पगार मिळतो. तसेच गैरअर्जदार क्र. १ वर स्वत:ची, आई, वडील, बहिण व भाऊ या सर्वांची जबाबदारी आहे. गैरअर्जदार क्र.१ च्या उत्पन्नावर अवलंबुन असुन गैरअर्जदार क्र. २ ते ५ ला स्वतंत्र उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही व कसे बसे जीवन जगत आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदार यांचा कोणताही छळ केलेला नाही व गैरअर्जदाराला त्रास देण्याच्याव उद्देशाने अर्जदार हिने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार हिने सदर खोटा व बनावटी अर्ज गैरअर्जदार यांचे विरूध्द दाखल असल्याचे नमूद आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदाराने खोटे व बनावटी आरोप करून खोटी केस दाखल केल्याचे नमूद करून, ते अर्जदारास कोणत्याही प्रकारची पोटगी किंवा नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नसल्याचे त्यांचे कथन आहे. तसेच अर्जदाराने केलेली अंतरिम पोटगीची मागणी फेटाळून लावण्याची विनंती गैरअर्जदारांनी केलेली आहे.

**१५.** अर्जातील कथन लक्षात घेता, खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निर्माण झालेले असून त्याबाबतचे निष्कर्ष प्रस्तुत मुद्यासमोर नमुद करुन त्याबाबतची कारणमिमांसा खाली देत आहे.

| अनु क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार ह्या त्यांच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याची बाब प्रथमदर्शनी शाबीत करते काय ? | होय |

| | | |
|---|---|---|
| ०२. | अर्जदार ह्या अंतरिम पोटगीसाठी रक्कम रू.१५,०००/- व घरभाडे करीता रक्कम रु.५,०००/- प्रतिमाह मिळण्यास पात्र असल्याचे प्रथमदर्शनी शाबित करते काय ? | **अंशतः होकारार्थी** |
| ०३. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**१६.** अर्जदाराचे विद्वान वकील यांनी अर्जाप्रमाणे युक्तीवाद करुन प्रस्तुतचा अर्ज प्रार्थनेप्रमाणे मंजूर होण्याची विनंती केली. उलटपक्षी गैरअर्जदारा यांच्या विद्वान वकिलांनी त्यांच्या म्हणण्यानूसार यथोचित युक्तीवाद करुन अर्ज नामंजूर होण्याची विनंती केली.

**मुद्दा क्र. १ करीता**-

**१७.** प्रस्तुत अर्जान्वये अर्जदाराने महिलांचे घरगुती हिंसाचापासून प्रतिबंधक कायद्याचे कलम २३ अन्वये मागणी केलेली आहे. प्रस्तुत कायद्याचे मुळ तत्व अथवा उद्देश लक्षात घेता पिडीत महिलेला त्वरीत न्याय मिळावा याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने केवळ प्रथमदर्शनी हिंसाचार झाल्याची बाब अर्जदाराने शाबीत करणे अपेक्षीत असते. अर्जदाराने शपथेवर दिलेला तोंडी पुरावा देखील त्याकरीता पुरेसा असतो.

**१८.** अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांना त्यांचे लग्न दि. २८/०४/२०२४ रोजी झाल्याची बाब मान्य आहे. अर्जदाराने शपथेवर कथन केल्याप्रमाणे गैरअर्जदार यांनी अर्जदारास कोणतेही कारण ती जवळ जरी गेली तर तिला तो ढकलुन देत होता व म्हणत होता की, तु मला पसंत नाही, तु मला आवडत नाही, तुझे आईवडीलांनी आमचा लग्नामध्ये चांगला मानपान केला नाही, आमच्या ऐपती प्रमाणे लग्न लावुन दिलेले नाही, आम्हाला चांगला हुंडा मिळाला असता तुझे पेक्षा जास्त पैसा देणारी पार्टी आमचे कडे मागणी घालत होते, आम्हाला तुझे आईवडीलांनी मनावा तेवढा पैसा दिलेला नाही, तुला काम धंद्याची सोय नाही, तुझे आई वडील गावंडळ आहे असे बोलुन तिला शारिरीक व मानसिक त्रास देऊन पैशांची मागणी करत असे. त्यामुळे, अर्जदार ही तिच्या आई वडीलांकडे निघून गेली व सद्या ती आश्रीतांचे जिवन जगत असल्याचे शपथपुर्वक नमूद केलेले आहे. दि.१५/१२/२०२४ पासून अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असून गैरअर्जदार क्र.१ यांनी त्यांच्या उदरनिर्वाहाची कोणतीही तडजोड केलेली नसल्याचे देखील तिने शपथपुर्वक कथन केलेले आहे. उपरोक्त परिस्थितीत, अर्जदार हिने शपथेवर केलेल्या सदर विधानांवरून प्रथमदर्शनी तिच्यावर कौटुंबीक हिंसाचार झाल्याची बाब अर्जदाराने प्रथमदर्शनी शाबीत

केलेली आहे. सबब, मुद्दा क्र. ०१ चे उत्तर मी होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता -</u>**

**१९.** अर्जदाराने स्वतः अंतरिम मागणी अंतर्गत दरमहा पोटगी रू.१५,०००/- व घरभाडे करीता रक्कम रु.५,०००/- प्रतिमाह ची मागणी केलेली असुन, तिच्या कथनानुसार गैरअर्जदार क्र.१ वर तिचे व्यतिरिक्त इतर कोणीही अवलंबून नसल्याचे तिचे कथन असुन तिचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र व प्रस्तुत अर्जात केलेली कथने जशीच्या तशी गृहित धरली तरी गैरअर्जदार क्र.१ हा नौकरीवर असून त्याला दरमहा रू.३०,०००/- ते रू.४०,०००/- इतका पगार मिळत असुन त्याच्याकडे मौजा डोंगरहळदी येथे सर्व्हे क्र. ४२/१ आराजी ०.८१ हे.आर. शेती असल्याचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्रात नमुद केलेले आहे.

**२०.** गैरअर्जदार क्र. १ याने स्वत: खासगी नौकरीवर असल्याचे मान्य केले असले तरी त्याच्या उत्पन्नाबाबत मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. परंतु त्याने त्याच्या लेखी जबाबात त्याला प्रतिमाह रु.१७,०००/- ते रु.१८,०००/- इतका पगार मिळत असल्याचे मान्य केले आहे. याउलट, गैरअर्जदार क्र. १ ने त्याच्यावर त्याच्यावर आईवडील, भाऊ व बहिण यांच्या पालणपोषणाची जबाबदारी असल्याचे कथन केलेले आहे. अर्जदार यांनी गैरअर्जदार याला प्रति माह ३०,०००/- ते ४०,०००/- इतका पगार मिळत असलेतरी त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आलेला नाही. याउलट, गैरअर्जदार क्र.१ याने त्याच्या लेखी जबाबात कथन केलल्याप्रमाणे तो खाजगी नौकरी करत असल्याचे व त्याला प्रतिमाह रु.१७,०००/- ते रु.१८,०००/- इतका पगार मिळत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

**२१.** जरी गैरअर्जदार क्र. १ चे कथन आहे तसे ग्राह्य धरले व त्यांच्यावर त्यांच्या आईवडील, भाऊ व बहिणीच्या पालन पोषणाची जबाबदारी असलीतरी अर्जदाराचे पालनपोषण करण्याची नैतिक व कायदेशिर जबाबदारी पती या नात्याने त्यांची आहे. त्यामुळे, गैरअर्जदार यांचे राहणीमान लक्षात घेऊन अर्जदार दरमहा रू.२०००/- पोटगीकामी व दरमहा रु.१५००/- घरभाडे मिळण्यास पात्र असल्याचे माझे प्रथमदर्शनी मत आहे.

**२२.** करिता, गैरअर्जदार क्र.१ यांची कायदेशिर व नैतिक जबाबदारी प्रथमदर्शनी उपलब्ध पुराव्यावरून लक्षात घेता, सध्याच्या महागाईच्या काळात ज्यावेळी गैरअर्जदार क्र.१ वर त्याचे आई वडीलांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी आहे, त्यावेळी अर्जदार दरमहा रक्कम रू.२०००/- पोटगीकामी व दरमहा रु.१५००/- घरभाडे मिळणेस पात्र आहे. करिता मुद्दा क्र.२ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ करीता -</u>**

**२३.** मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्ष विचारात घेता मुद्दा क्र. ३ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

**२.** गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार यांना अंतरीम पोटगीकामी दरमहा रक्कम रूपये २,०००/- (दोन हजार रुपये फक्त) व घरभाडेकरीता दरमहा रक्कम रुपये १,५००/- (एक हजार पाचशे रुपये फक्त) अर्ज दाखल तारखेपासून प्रस्तुत प्रकरणा मध्ये पुढील आदेश होईपावेतो द्यावे, असे आदेशीत करण्यात येते.

**३.** गैरअर्जदार क्र. १ यांनी आर्थीक सहाय्य देण्यास टाळाटाळ केल्यास त्याचा बचाव नाकारण्यात येईल. अर्जदार यांनी सदर आदेशानंतर प्रकरण चालवण्यास दिरंगाई केल्यास योग्य तो आदेश करण्यात येतील याची उभय पक्षांनी नोंद द्यावी.

**४.** आदेशाची प्रत उभय पक्षांना विनामुल्य देण्यात यावी.

(Sd-)
**(उमाकांत पी. शिंदे)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
गोंडपिपरी

ठिकाण : गोंडपिपरी
दिनांक : १६/०६/२०२६

**प्र मा ण प त्र**

मी प्रमाणित करते की या पि.डी.एफ. करून अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द-नि-शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | उमेश रा. आमटे, लघुलेखक श्रेणी-३. |
| न्यायालयाचे नांव | : | न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, गोंडपिपरी. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | १६/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | १६/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | १६/०६/२०२६ |